॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ३ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, येथील विद्यापीठ क्रीडा संकुलात आंतरविभागीय स्विमिंग, बॅडमिंटन व टेबल टेनिस या क्रीडा स्पर्धांना उत्साहपूर्ण उद्घाटन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर सिनेट सदस्य प्रा. डॉ. कीर्ती कमळजा, श्रीमती वैशाली वराडे, क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील, प्रा. डॉ. संजय चौधरी, प्रा. डॉ. गोविंद मारतळे, डॉ. देवदत्त पाटील, डॉ. उमेश पाटील आदी उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी खेळाडूंना मार्गदर्शन करताना कुलसचिव डॉ. विनोद पाटील म्हणाले की, "प्रत्येक खेळाडूने आपल्या क्षमतेनुसार सर्वोत्तम खेळाचे प्रदर्शन करावे. आंतरविभागीय स्पर्धांमधूनच विद्यापीठाच्या विविध क्रीडा संघांची निवड केली जाणार आहे. त्यामुळे खेळाडूंनी स्पर्धेतील नियम व शिस्तीचे काटेकोरपणे पालन करून उत्कृष्ट कामगिरी करावी आणि आपल्या विभागासह महाविद्यालयाचे नाव लौकिक करावे."

प्रा. कीर्ती कमळजा यांनी आवाहन केले की, भारतातील मुलींनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली असून, त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन विद्यार्थिनींनीही विविध क्रीडा प्रकारांत आपला ठसा उमटवावा. या क्रीडा स्पर्धांमध्ये जळगाव, एरंडोल, धुळे व नंदुरबार या विभागांतील पुरुष व महिला संघांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला आहे. स्विमिंग, बॅडमिंटन आणि टेबल टेनिस या क्रीडा प्रकारांमध्ये खेळाडूंमध्ये मोठी चुरस पाहायला मिळत असून, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना पुढील विद्यापीठस्तरीय संघासाठी संधी मिळणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिनेश पाटील यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. शैलेश पाटील यांनी केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ३ सप्टेंबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता